## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार

### तक्रार क्र. १७२/२०२६

तक्रारकर्ता, श्री. सूर्यकांत परशुराम नाईक,
ज्युलियट कॉम्प्लेक्स-१२, अ, सालईवाडा,
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदूर्ग - ४१६ ५१०

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा. महसूल अधिकारी,
आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी सिंधूदुर्ग कार्यालय,
जि. सिंधुदूर्ग

प्रथम अपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग मुख्य प्रशासकीय इमारत, ओरोस, सिंधुदूर्गनगरी, ता. कुडाळ,
जि. सिंधुदूर्ग ४१६ ८१२

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ६/१०/२०२५ | -- | ९/०३/२०२६ | ३०/०३/२०२६ |

जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल आदेश होऊनही अद्यापपर्यंत कोणतीच माहिती दिली नाही, असे कारण नमूद करुन तक्रारकर्ता श्री. सूर्यकांत परशुराम नाईक यांनी, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दि. २८/०४/२०२६ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केलेली आहे.

तक्रारकर्ता यांच्या सदर तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता, तक्रारकर्ता यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ६ अन्वये माहिती अर्ज दाखल केला असून, सदर अधिनियमातील कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्याकडे प्रथम अपिल अर्ज दाखल केला असल्याचे दिसून येत आहे.

प्रथम अपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांनी प्रथम अपिलावर दि.३०/०३/२०२६ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केले आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या उपलब्ध माहितीची प्रत अपिलार्थी यांना विनाशुल्क पुरविणेची आहे."

सदर प्रकरणी तक्रारकर्ता यांना प्रथम अपिल आदेशानंतरही जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अथवा वस्तुस्थितीदर्शक उत्तर दिल्याचे दिसून येत नाही. सबब, माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) मधील तरतूद विचारात घेता, आयोगाने सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार सदर तक्रारीची सुनावणी दि. ०६/०८/२०२६ रोजी आयोजित करण्यात येत आहे. सदर सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत तक्रारकर्ता तसेच जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महसूल अधिकारी, आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग व प्रथम अपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांना नोटीस बजावण्यात यावी.

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० जून, २०२६

प्रत,

१) श्री. सूर्यकांत परशुराम नाईक, ज्युलियट कॉम्प्लेक्स-१२, अ, सालईवाडा, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदूर्ग - ४१६ ५१०
२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महसूल अधिकारी, आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग, जि. सिंधुदूर्ग
३) प्रथम अपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग मुख्य प्रशासकीय इमारत, ओरोस, सिंधुदूर्गनगरी, ता. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग ४१६ ८१२

**तक्रार क्र. १७२/२०२६**
**तक्रारकर्ता, श्री. सूर्यकांत परशुराम नाईक,**
**<u>विवेचन</u>**

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. चैताली सावंत, तहसिलदार महसूल, जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग या ऑनलाईन उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती दिलेली आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती देण्यात आल्यामुळे, प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १ सप्टेंबर, २०२६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ